सत्यमेव जयते

# जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी यांचे कार्यालय, चंद्रपूर

ई-मेल : chandrapur.rdc@gmail.com फोन क्रमांक – 07172-250659

क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2020/833 दिनांक :- 21ऑगस्ट, 2020

संदर्भ :- 1. केंद्र शासन, गृह विभाग, नई दिल्ली यांचे आदेश 40-3/2020-DM-I(A) दि. 29.07.2020.
2. महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अधिसुचना क्रं.डीएमयु/2020/सीआर-92/डिआयएसएम-1 दिनांक 29.07.2020.
3. या कार्यालयाचे आदेश क्रं.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/748/2020 दि. 31.07.2020.
4. महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे आदेश क्रं.डीएमयु/2020/सीआर-92/डिआयएसएम-1 दिनांक 19.08.2020.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी कार्यालय ★ चंद्रपूर ★

## -: आदेश :-

**(कोविड-19 विषाणुचे अनुषंगाने आंतरजिल्हा वाहतूक सुरु करणेसंदर्भात मार्गदर्शक सुचना)**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यात साथरोग अधिनियम 1897 ची अंमलबजावणी सुरू झालेली आहे. या अधिनियमा अंतर्गत खंड 2,3 व 4 नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार कोरोना विषाणू (कोविड-19) या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव होण्यास प्रतिबंध करणे याकरीता संदर्भिय क्र. 02 वरील राज्य शासनाकडील आदेशाचे अनुषंगाने या कार्यालयाचे संदर्भिय क्र. 03 वरील आदेशानुसार मनाई आदेश निर्गमित करण्यात आलेला आहे व सध्यास्थितीत सदर आदेशाच्या तरतूदी चंद्रपूर जिल्ह्यात लागू आहेत;

**आणि ज्याअर्थी,** या कार्यालयाचे संदर्भिय क्रं. 03 वरील आदेश दिनांक 31/07/2020 अन्वये, फौजदारी प्रक्रिया दंड संहिता, 1973 चे कलम 144 (1) (3) अन्वये चंद्रपूर जिल्हयात दिनांक 01 ऑगस्ट, 2020 ते दिनांक 31 ऑगष्ट, 2020 पर्यंत काही अंशी शिथीलता देऊन नागरीकांच्या दैनंदिन व्यवहारात निर्बंध घालून आदेश निर्गमीत करण्यात आलेले आहेत;

**आणि ज्याअर्थी,** या कार्यालयाचे आदेश दिनांक 31/07/2020 अन्वये, आंतर-जिल्हा वाहतुकी संदर्भात नियंत्रण घालण्यात आलेले आहे. परंतू राज्य शासनाकडील संदर्भिय क्र. 04 वरील आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय मुंबई, महाराष्ट्र शासन, यांचे आदेश क्र. आव्यप्र/2020/ सीआर-92/Dis M-1 दिनांक 19.08.2020 अन्वये आंतरजिल्हा वाहतूक सुरु करणेसंदर्भात निर्देश प्राप्त झालेले आहे.

**त्याअर्थी, मी, अजय गुल्हाने, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर** या जिल्ह्यात प्रवासाचे आवागमन संदर्भात खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करीत आहे.

अ) <u>महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ बसेसबाबत:</u>

1. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अखत्यारीतील आंतर-जिल्हा बसेस सुरु करण्यात येऊन कमाल प्रवास धारण क्षमतेच्या 50 % प्रवासी वाहतूक करण्याची परवानगी देण्यात येत आहे.
2. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ अखत्यारीतील 50 % बस डेपोंना प्रवासी वाहतूक करण्याची परवानगी देण्यात येत आहे.
3. नजीकच्या अंतरावरील बसेस तुर्तास सुरु करण्यात येऊन लांबच्या पल्ल्याचे बसेस पुढील आदेशापर्यंत सुरु करण्यात येऊ नये.
4. बसेसमध्ये सामाजिक अंतराच्या मर्यादेत कमाल केवळ 22 प्रवाशांना प्रवासाची अनुमती असेल. याहून अधिक प्रवासी आढळल्यास संबंधित आगारप्रमुख यांचेवर आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, 2005 अन्वये कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल.
5. बसेसमध्ये सॅनिटायझर उपलब्ध ठेवावे. तसेच प्रवासानंतर बसेसचे नियमितपणे निर्जंतुकीकरण करण्यात यावे. वाहनचालक, वाहक व प्रवासी यांनी मास्क लावणे बंधनकारक असेल.
6. मास्क वा चेहऱ्यावर रुमाल असल्याशिवाय कोणत्याही प्रवाशाला बसमध्ये प्रवेश देऊ नये. तसेच प्रत्येक प्रवाशाने आधार किंवा इतर कोणतेही **ओळखपत्र** स्वत:जवळ बाळगणे अनिवार्य असेल.
7. **<u>या जिल्ह्यातील आगारातून</u>** सुटणाऱ्या व परत येणाऱ्या प्रत्येक बसेसमधील प्रवाशांचे तपशील/हमीपत्र विहीत प्रपत्रात गोळा करण्याची जबाबदारी संबंधित **बसवाहक** यांची असेल. याकरिता आवश्यक हमीपत्र, बसेसमध्ये पेन/पेन्सिल इत्यादी पुरवठा करण्याची जबाबदारी विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांची असेल.
8. **<u>बाहेर जिल्ह्यातील आगारातून</u>** सुटणाऱ्या व परत येणाऱ्या प्रत्येक बसेसमधील प्रवाशांचे तपशील/हमीपत्र विहीत प्रपत्रात गोळा करण्यासंदर्भात आवश्यक मनुष्यबळ पुरविण्याची जबाबदारी ही विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, चंद्रपूर यांची असेल. याकरिता आवश्यक हमीपत्र, बसेसमध्ये पेन/पेन्सिल इत्यादी पुरवठा करण्याची जबाबदारी विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, चंद्रपूर यांची असेल.
9. बसेसचे चालक व वाहक यांची किमान 07 दिवसातून एकदा कोरोना चाचणी स्थानिक शासकीय रुग्णालयांमधून **तालुका आरोग्य अधिकारी / वैद्यकीय अधिकारी, चंद्रपूर शहर महानगरपालिका** यांचे माध्यमातून करण्यात यावी.
10. प्रत्येक प्रवाशाला चंद्रपूर जिल्हा क्षेत्रात प्रवेश केल्यानंतर प्रवासानंतर 14 दिवसाकरिता गृह विलगीकरणात **(होम क्वारांटाईन)** राहणे बंधनकारक असेल. सदर व्यक्तींनी कोविड-19 अंतर्गत विलगीकरणाचे पालन आरोग्यप्रकारे करावे. दरम्यान त्यांची कोरोना चाचणी स्थानिक शासकीय रुग्णालयांमधून **तालुका आरोग्य अधिकारी / वैद्यकीय अधिकारी, चंद्रपूर शहर महानगरपालिका**

यांचे माध्यमातून करण्यात यावी. **तथापि** जे प्रवाशी कोरोना साथरोग संदर्भाने रेड झोन/हॉटस्पॉट्स मधून प्रवास करुन येत असतील त्यांना **संस्थात्मक विलगीकरणात** राहणे बंधनकारक असेल. याकरिता आवश्यक कार्यवाही संबंधित **तहसिलदार/आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालिका** करतील.

11. प्रति दिवस प्रवासाचे संपूर्ण तपशील (आगार निहाय/बसनिहाय) विहीत प्रपत्रात दुसऱ्या दिवशी सकाळी 10.00 वाजता या कार्यालयाचे ई-मेल आई-डी chandrapur.rdc@gmail.com यावर पाठविण्यात यावे. सदर जबाबदारी **विभाग नियंत्रक**, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ चंद्रपूर यांची असेल.
12. सदर मेल दररोज सकाळी **आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालिका/संबंधित तहसिलदार** यांचे मेलवर पाठविण्यात येईल. त्यानुसार सर्व प्रवासी विलगीकरण झाल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी संबंधित **तहसिलदार** यांची असेल. याकरिता त्यांना नगरपालिका प्रशासन, आरोग्य व पोलीस विभागाने योग्य ते सहकार्य करावे.
13. बसेसमध्ये निर्धारित केलेप्रमाणे प्रवासी वाहतूक सुरु असून सर्व विहीत प्रपत्रात हमीपत्र भरुन घेत असल्याची खात्री करण्यासंदर्भात **सहायक आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालिका/नायब तहसिलदार** यांना पथक प्रमुख नेमून फिरते पथक नेमण्याबाबत **आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालिका/ संबंधित तहसिलदार** यांनी त्यांचे स्तरावर कार्यवाही करावी.
14. सदर विभागाचे अधिकारी/कर्मचारी व नागरिकांचे नियोजनानुसार कोरोना चाचणी वेळेत करण्याची जबाबदारी **जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, चंद्रपूर** यांची असेल.
15. सदर आदेशातील सूचना एस.टी. आगार येथे ठळकपणे दिसेल अशा लावण्यात याव्यात.

**आ) <u>महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ बसेस व्यतिरिक्त :-</u>**

1. सर्व व्यक्तींच्या आंतरराज्य/राज्यांतर्गत (आंतर-जिल्हा) होणाऱ्या विना परवाना हालचाली बंद राहतील.
2. **परराज्यात/राज्यांतर्गत (चंद्रपूर जिल्ह्यातून इतर जिल्ह्यात) प्रवासाकरीता https://covid19.mhpolice.in यावर ऑनलाईन अर्ज करावा.**
3. चंद्रपूर जिल्ह्या-तंर्गत प्रवासाला कोणत्याही पासची गरज नाही.
4. चंद्रपूर जिल्ह्यात बाहेर राज्यातून वा बाहेर जिल्ह्यातून विना परवाना प्रवेश करता येणार नाही. याकरिता **दंडाची तरतूद** यापूर्वीच्या आदेशानुसार सुरु राहील.
5. चंद्रपूर जिल्ह्याबाहेरुन सक्षम अधिकाऱ्याची परवानगी घेऊन चंद्रपूर जिल्ह्यात प्रवेश करणाऱ्या व्यक्तिंना आरोग्य विभाग व या कार्यालयाकडून दिलेल्या निर्देशानुसार विलगीकरणात राहणे बंधनकारक असेल.

या आदेशात दिलेल्या **विभागनिहाय व अधिकारीनिहाय जबाबदाऱ्या** आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 चे कलम 33 अन्वये देण्यात येत असून यात हयगय/बेजबाबदारपणा/कर्तव्यात कुचराई केल्यास आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 चे कलम 56 अन्वये कारवाई प्रस्तावित करण्यात येईल.

तसेच सदरील आदेशाचे पालन न करणारी/ उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती, संस्था अथवा समुह यांनी साथरोग (प्रतिबंध) कायदा 1897, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, 2005 तसेच भारतीय दंड संहिता 1860 नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला आहे असे मानण्यात येईल व नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**सदरचा आदेश चंद्रपूर जिल्हयात दिनांक 21/08/2020 रोजी पासून पुढील आदेशापर्यंत लागू करण्यात येत आहे.**

**सदरचा आदेश आज दिनांक 21/08/2020 रोजी माझे सही व शिक्क्यानिशी पारीत करीत आहे.**

(अजय गुल्हाने)
जिल्हा दंडाधिकारी, चंद्रपूर

**<u>प्रतिलीपी :- माहितीस्तव सादर.</u>**

1. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - 032
2. मा. सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई - 032
3. मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर
4. महाव्यवस्थापक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई

**<u>माहितीस तथा आवश्यक कार्यवाहीस्तव.</u>**

5. पोलीस अधिक्षक, चंद्रपूर
6. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर
7. आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर
8. जिल्हा शल्य चिकीत्सक, सामाण्य रुग्णालय, चंद्रपूर
9. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, चंद्रपूर
10. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. चंद्रपूर
11. जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर
12. जिल्हा प्रशासन अधिकारी, नगर पालिका प्रशासन, जि.का. चंद्रपूर
13. विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, चंद्रपूर
14. उपविभागीय दंडाधिकारी (सर्व)
15. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी (सर्व)
16. मुख्याधिकारी, नगर परिषद/ नगर पंचायत (सर्व)
17. सर्व संबधीत विभाग प्रमुख ----------------------------------

**<u>सदर आदेशाची उपरोक्त अधिकारी यांनी प्रसिध्दी द्यावी.</u>**

जिल्हा दंडाधिकारी, चंद्रपूर